निर्णय क्र. मविनिआ/माअअ/२०२१/अपील/०७/२०२१/४२७ दिनांक-२२.०९.२०२१

| | |
|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | :२२.०६.२०२१ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | :२३.०७.२०२१ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | :२८.०७.२०२१ |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | :२२.०९.२०२१ |

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

**अपील क्र. ०७/२०२१**

**अपीलकर्ता:** श्री. उज्वलराय मोरेश्वर जोशी

**विरुदध**

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपीलाचे तथ्य :-**

१) अपीलकर्ता यांनी दिनांक २०.०६.२०२१ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक २२.०६.२०२१ रोजी प्राप्त झाला. अपीलार्थी यांच्या दिनांक २०.०६.२०२१ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत दालख केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३.०७.२०२१ च्या पत्र क्रमांक-०३२९ अन्वये माहिती उपलब्ध करून दिलेली आहे.

२) अपीलार्थी यांनी दिनांक २६.०७.२०२१ रोजी माहिती अधिकार कायदा अंतर्गत प्रथम अपील पोष्टाद्वारे दाखल केले. (प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक २८.०७.२०२१ रोजी प्राप्त झाले).

३) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक ०९.०८.२०२१ रोजी नोटिस पाठवून दिनांक २३.०८.२०२१ रोजी सुनावणी आयोजीत केली होती परंतू, अपिलार्थी यांनी दिनांक २३.०८.२०२१ रोजीच्या ई-मेल द्वारे *"माझी तब्येत बरी नसल्याने आणि अंगात ताप (१००.५०) असल्याने आज दुपारी १२.०० वाजता होणार*



१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
Tel.: 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 Fax : 022-2216 3976
E-mail : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in Website : www.merc.gov.in / www.mercindia.org.in

*असलेली सुनावणी कृपया साधारण १० दिवस पुढे ढकलण्यात यावी व मला तसे कळविण्यात यावे"* अशी विनंती केली. त्याअनुषंगाने अपिलार्थी यांनी केलेली विनंती प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मान्य करून सदर सुनावणी दिनांक २३.०८.२०२१ रोजी नोटीस पाठवून पुन:श्च सुनावणी दिनांक ०३.०९.२०२१ रोजी दुपारी ३:०० वाजता प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दालनात आयोजीत केली. सुनावणी च्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोन्ही हजर होते. अपिलार्थी व माहिती अधिकारी यांनी मौखिक निवेदन सादर केले.

**४) अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागितलेली माहिती:-**

*Action taken, order passed on the letter Dt. 25.05.2021 from Milind Narkar, Desk Officer, energy Dept GoM.*

**५) जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-**

*श्री मिलिंद नारकर, कक्ष अधिकारी यांचे दि. २५ मे २०२१ च्या पत्रामध्ये उपस्थित केलेल्या मुद्या क्र. १ ते ६ बाबत काय कारवाई केली याबाबतची माहिती विचारली आहे. त्यानुसार मुद्या क्र. १ ते ५ बाबत उपस्थित केलेली माहिती ही आयोगाच्या कार्यालयाशी संबधित नाही. उर्वरित मुद्या क्र. ६ बाबत कार्यालयामार्फत कार्यवाही सुरु आहे. याबाबतची कार्यवाही पूर्ण होताच याबाबतची माहिती उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय यांना कळविण्यात येईल व त्याची एक प्रत आपणांस माहितीस्तव पाठविण्यात येईल.*

दिनांक २५.०५.२०२१ रोजीच्या पत्रातील मुद्दा क्र.६ हा येणे प्रमाणे:-

"म.ना.वि.वि.कं ची सर्व कार्यालये तसेच MERC येथे देखील कर्मचारी ओळखपत्र धारण करतात किंवा नाही हे CCTV Footage च्या माध्यमातून संबंधित व्यवस्थापनाने नियमित तपासणी करून चुकार कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, अशी अपेक्षा करण्यात आली आहे."

**६) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-**

अर्जावर/ईमेल ला २७५ दिवस, दि.२२.०१.२०२१ च्या माहिती अधिकारातील अर्जाला १८५ दिवस आणि दि.२०.०६.२०२१ रोजीच्या माहिती अधिकारातील अर्जाला ३७ दिवस होऊन गेल्यावर सुध्दा उत्तर देण्यात आलेले नाही.

**७) अपिलातील दस्तऐवज व निवेदनावरुन अपिलातील मुददे खालील प्रमाणे आहेत -**

अ) अपिलार्थी यांनी माहिती कायदा अंतर्गत अपिलात त्यांना नेमके कुठले दस्त ऐवज पाहिजेत याचा उल्लेख केलेला नाही.

ब) अपिलार्थी यांच्या संदर्भातील दिनांक १४.११.२०२० रोजीचा पाठविलेला ई-मेल याचा तसेच दिनांक २२.०१.२०२१ रोजीचा माहिती अधिकाराचा अर्ज याचा या अपिलाशी काहीही संबंध नाही.

क) सदरहू अपिल हे अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २०.०६.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत केलेले अपिल हे श्री. मि.प्र. नारकर, कक्ष अधिकारी, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांचे पत्र क्रमांक: संकिर्ण-२०२१/ऊर्जा-२ दिनांक- २५ मे, २०२१ अन्वये मा.सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांना लिहिलेल्या पत्रानुसार वर उपस्थित मुद्दा क्र.६

ला संबंधीत असून प्रचलित नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व त्या संबंधाने अर्जदारास परस्पर अवगत करण्यात यावे याबाबत ची विनंती आहे.

करीता, माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर/उपलब्ध करून दिलेली माहिती वरील परिच्छेद क्रमांक-५ अन्वये योग्य असून त्यात अपिलीय अधिकारी यांना हस्तक्षेप करण्याची गरज वाटत नाही.

तथापि, माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र.६ ची कार्यवाही पूर्ण होताच माहिती उपलब्ध करून देण्याचे अपिलार्थी/अर्जदार यांना कळविले आहे. करीता, सदरहू कार्यवाही पूर्ण होताच अपिलार्थी यांना त्या संबंधाची माहिती उपलब्ध करून देण्यात यावी.

वरिल कारण मिमांसेवरून सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

**निर्णय**

मुद्दा क्र. ६ नुसार कार्यवाही पूर्ण होताच अपिलार्थी यांना त्या संबंधाची माहिती उपलब्ध करून देण्यात यावी.

सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

22/9/21

**(अनिलकुमार उके)**

**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**

प्रति,
श्री. उज्ज्वलराय मोरेश्वर जोशी,
४, देविका सोसायटी, रामभाऊम्हाळगी मार्ग,
अष्ट विनायक चौक, मीठ बंदर मार्ग,
ठाणे (पूर्व)-४००६०३.
मो.नं.९८६९४६४०४३

22/9/21

**(अनिलकुमार उके)**

**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**